दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper. lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२५१ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, २२ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## गावे समाविष्ट करण्याच्या नव्या निर्णयाला नव्याने आव्हान द्या, विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांना उच्च न्यायालयाची सूचना



**ठाणे, विशाल कारंडे :**

वसई-विरार महापालिकेच्या पश्चिम पट्ट्यातील हद्दीतील २९ गावांबाबत राज्य सरकारने नुकत्याच काढलेल्या अधिसूचनेला नव्याने आव्हान द्या, अशी सूचना उच्च न्यायालयाने मंगळवारी निर्णयाला विरोध असलेल्या याचिकाकर्त्यांना केली. वसई-विरार महापालिकेच्या हद्दीतून २९ गावे वगळण्याच्या राज्य सरकारच्या २०११ मधील अधिसूचनेला विविध याचिकाकर्त्यांनी आव्हान दिले होते. तर हस्तक्षेप याचिका करून काहींनी याचिकाकर्त्यांच्या मागणीला विरोध केला होता. या याचिकांवर न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी झाली. त्यावेळी, वसई-विरार महापालिकेत संबंधित २९ गावे समाविष्ट राहतील याबाहतची नवी अधिसूचना सरकारने काढल्याची माहिती सरकारी वकिलांनी न्यायालयाला दिली. त्याची दखल घेऊन न्यायालयाने आधीच्या अधिसूचनेला आव्हान देणाऱ्या याचिका निकाली काढण्याचे स्पष्ट केले. तसेच, गावे समाविष्ट करण्याला विरोध असणाऱ्या याचिकाकर्त्यांनी सरकारच्या निर्णयाला नव्या याचिकेद्वारे आव्हान देण्याचे स्पष्ट केले. त्याचवेळी, याचिका निकाली काढण्याबाबतचा आदेश गुरुवारी देणार असल्याचेही स्पष्ट केले. वसई-विरार पालिकेतून २९ गावे वगळण्याचा प्रश्न मागील दहा वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहे.

## विधानसभा अध्यक्षांसह शरद पवार गटाच्या १० आमदारांना उच्च न्यायालयाची नोटीस

**मुंबई, यश सावंत :**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या १० आमदारांना पात्र ठरवण्याच्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा निर्णय कायद्याला धरून नाही, असा दावा करून या निर्णयाला आव्हान देणाऱ्या राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाच्या याचिकेची उच्च न्यायालयाने बुधवारी दखल घेतली. तसेच, विधानसभा अध्यक्षांसह शरद पवार गटाच्या १० आमदारांना नोटीस बजावून याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. अजित पवार गटाचे मुख्य प्रतोद अनिल पाटील यांनी विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात याचिका केली असून शरद पवार गटाच्या आमदारांना अपात्र घोषित करण्याची मुख्य मागणी याचिकेद्वारे केली आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि



न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठासमोर अजित पवार गटाच्या याचिका बुधवारी सुनावणीसाठी आल्या. त्यावेळी, न्यायालयाने अजित पवार गटाचे म्हणणे थोडक्यात ऐकल्यानंतर विधानसभा अध्यक्षांसह शरद पवार गटाच्या आमदारांना नोटीस बजावली व याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. तत्पूर्वी, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाचा राष्ट्रवादी काँग्रेसवर हक्क आहे. तो त्यांच्याच गटाचा पक्ष आहे, असा निर्णय दिल्यानंतर शरद पवार गटाच्या आमदारांना अपात्र ठरवण्याच्या मागणीसाठी आपल्या गटाने केलेल्या याचिकाही अध्यक्षांनी मान्य करायला हव्या होत्या. मात्र, दोन्ही गटातील आमदारांना पात्र घोषित करण्याच्या अध्यक्षांच्या निर्णयामुळे पक्षातील फूट हा पक्षांतर्गत मतभेद असल्याचा चुकीचा निष्कर्ष काढला, असा दावा अजित पवार गटाकडून न्यायालयात करण्यात आला. दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार गटाचा असल्याचा निकाल जाहीर करतानाच दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र ठरवले होते. शरद पवार यांनी १९९९ मध्ये राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली होती. मात्र, गेल्यावर्षी जुलै महिन्यात अजित पवार यांच्यासह आठ आमदारांनी बंड केले व सत्ताधारी भाजप-शिवसेना सरकारमध्ये सहभागी झाले. त्यानंतर, दोन्ही गटामध्ये फूट पडली व पक्ष कोणाचा या प्रश्नाचा वाद अध्यक्षांकडे गेला. तेथे एकमेकांच्या आमदारांना राज्यघटनेच्या दहाव्या अनुसूचीच्या कलम २(१)(अ) अंतर्गत अपात्र ठरवण्याची मागणी दोन्ही गटांनी केली.

## 'विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्याला ड्रग्जचा विळखा; ड्रग माफियांना कुणाचा आशीर्वाद?' – विजय वडेट्टीवार

**पुणे,अभिजित येरल्लू :**



राज्यात गेल्या १५ दिवसांत अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याचे दिसून आले. त्यातील बरेच गुन्हे हे पुणे आणि आसपासच्या परिसरातील आहेत. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात 2200 कोटींचे ड्रग्ज सापडले. सरकारच्या नाकर्तेपणामुळे पुण्याला ड्रग्जचा विळखा पडला आहे. महायुती सरकारच्या काळात ड्रग माफियांचा सुळसुळाट वाढला असून सरकारची डोळेझाक कशासाठी; ड्रग माफियांना कुणाचा आशीर्वाद आहे?, असा संतप्त सवाल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. पुणे पोलिसांच्या इतिहासातील सगळ्यात मोठी कारवाई मागील दोन दिवसांत झाली आहे. पुणे पोलिसांनी पुण्यातून जवळपास 2200 कोटींचे ड्रग्ज जप्त केले आहे. पुणे पोलिसांनी पुणे, विश्रांतवाडी, कुरकुंभ, दौंड आणि राजधानी दिल्लीमध्ये कारवाई केली. पण पुण्यातील ड्रग्जची व्याप्ती आणखी मोठी असल्याचे बोलले जात आहे. तरीही सरकार ड्रगच्या समूळ उच्चाटनासाठी धडक कारवाई करत नाही. सरकार डोळेझाक करत आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. राज्यातील तरुणाईला वाचविण्यासाठी ड्रग माफियांचा सरकारने वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. सरकारने धडक कारवाई करून जरब बसविली पाहिजे.

## बोर्डाच्या परीक्षेच्या तोंडावर वाहतूक कोंडीचा त्रास, जागोजागी सुरु असलेल्या खोदकामामुळे नागरिक त्रस्त



**भाईंदर, रोहित जसवाल :**

मिरा रोड व भाईंदर शहरात सध्या सिमेंट रस्ते उभारणी व इतर विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जात आहे. यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीची समस्या जाणवत आहे. तर यांचा गंभीर फटका आता बोर्डाच्या परीक्षेला जाणाऱ्या बारावीच्या विद्यार्थ्यांना सहन करावा लागणार आहे. मागील तीन वर्षांपासून मिरा भाईंदर शहरातील मुख्य मार्गावर मेट्रो मार्गिकेचे उभारण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. यावर उपाय म्हणून अनेक वाहनचालक हे प्रवासासाठी अंतर्गत रस्त्याचा वापर करू लागले आहेत. याने काहीश्या अंशी वाहतूक कोंडीची समस्या कमी झाली आहे. परंतु आता पुन्हा शहरातील बहुतांश अंतर्गत रस्त्यावर सिमेंट रस्त्याची उभारणी, महानगर गॅस वाहनी आणि विद्युत वाहिनी टाकण्याचे काम केले जात आहे. परिणामी या रस्त्यांवर देखील खोदकाम केले जात असून वाहतुकीसाठी केवळ अरुंद रस्ता शिल्लक राहिला आहे. याचा मोठा परिणाम हा शहराच्या संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर होत आहे.

यात दुपारी शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत वाहनांना मार्ग काढने कठीण होत आहे. त्यामुळे कित्येकदा लहानसे अंतर गाठण्यासाठी शालेय बस गाड्यांचा २० ते २५ मिनिटांचा वेळवाया जात आहे. अशा परिस्थितीत उद्यापासून सुरु होणाऱ्या बारावी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जाण्याचा प्रवासाचे नियोजन करणे कठीण होणार आहे. त्यात एखादा विद्यार्थी वाहतूक कोंडीत अडकून परीक्षेला उशिरा पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने तसेच वाहतूक विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी शिवसेना १४६ विधानसभा अध्यक्ष सचिन मांजरेकर यांनी केली आहे.

## नवी मुंबईत अधिकारी गेले अतिक्रमण हटवण्यास अन सापडला २० किलो गांजा, एकाला अटक



**नवी मुंबई, भावना जैन :**

नवी मुंबईतील कोपरखैरणे स्टेशन नजीक बुधवारी मनपाने अतिक्रमण विरोधी कारवाई करीत ३० पेक्षा अधिक झोपड्या काढून टाकल्या. या कारवाईत होणारा विरोध लक्षात घेत मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्तही लावण्यात आला होता. मात्र मनपाची कारवाई अचानक थांबवावी लागली आणि पोलीस कारवाई सुरु झाली. याला कारण होते ते अतिक्रमण हटवताना एका मागे एक गांजाच्या पिशव्या सापडू लागल्या .नवी मुंबईतील कोपरखैरणे स्टेशन नजीक आणि बालाजी चित्रपट गृहासमोर असलेल्या झोपडपट्ट्या काढून टाकण्यासाठी अतिक्रमण पथकाने आज कारवाई केली. हि कारवाई सुरु असताना झोपडीत राहणाऱ्यांनी, व्यवसायिकांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला. हा विरोध अपेक्षित असल्याने पोलीस बंदोबस्त हि ठेवण्यात आला होता. मात्र कारवाई करत असताना हळूहळू विरोध मावळू लागला आणि शिस्तीत कारवाई सुरु झाली. दरम्यान एका ठिकाणी झोपडी पाडू नये म्हणून एक व्यक्ती कमालीचा विरोध करत होती. पोलिसांनीही त्या व्यक्तिला समजावून सांगितले. मात्र त्याचा विरोध प्रखर होताना पाहून पोलिसांना संशय आला. पोलिसांनी काही वेळासाठी कारवाई थांबवली व त्या व्यक्तीला पकडून झोपडीची झडती घेतली असता गांजाच्या छोट्या मोठ्या पिशव्या सापडू लागल्या.

## शरद पवार कोल्हापूरच्या दौऱ्यावर, पत्रकार परिषदेत शरद पवारांचं भाजपच्या 'त्या' रणनीतीवर बोट

**कोल्हापूर, सचिन कदम :**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार कोल्हापूरच्या दौऱ्यावर आहेत. कोल्हापूरमध्ये बुधवारी त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी इंडिया आघाडी, महाविकास आघाडी, चंदीगड महापौर निवडणूक प्रकरण, राष्ट्रवादी काँग्रेसबाबतचा निवडणूक आयोगाचा निर्णय, कांदाबंदी यासंदर्भात भाष्य केलं. इंडिया आघाडीतील काही घटकपक्षांमध्ये वाद आहेत. वेगवेगळे पक्ष एकत्र येत आहेत. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालमध्ये अडचणी आहेत. पश्चिम बंगालमधील पक्ष पारंपरिकपणे एकमेकांच्या विरोधात आहेत. वरिष्ठ नेत्यांनी एकत्र बसून हे प्रश्न



सोडवण्यासाठी प्रयत्न करतोय, असं शरद पवार म्हणाले. इंडिया आघाडीच्या बैठकीत काँग्रेसच्या वतीनं मल्लिकार्जुन खरगे सहभागी होतात. महाराष्ट्रातील जागावाटपाच्या चर्चेत मी नसतो. जयंत पाटील, नाना पटोले आणि संजय राऊत एकत्र बसून चर्चा करतात. गुरुवारी त्यांची बैठक होत आहे,अस शरद पवार म्हणाले. महाराष्ट्रात मविआची बैठक गुरुवारी होत आहे, चर्चा होईल दोन तीन दिवसात काय होतू ते पाहू, असं त्यांनी म्हटलं. अशोक चव्हाणांचा निर्णय सर्वांसाठी आश्चर्यकारक होता. पण, मला तो आश्चर्यकारक वाटत नाही. भाजपनं एक श्वेतपत्रिका काढली होती,त्यात आदर्श प्रकरण आणि अशोक चव्हाण यांचं नाव होतं. मला वाटलं तो धमकावण्याचा प्रकार होता आणि त्याचा परिणाम होता, असं शरद पवार म्हणाले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि ठाकरेंची शिवसेना आम्ही एकत्र बसतो आणि काम करतो याचा अर्थ विलीनीकरण नाही, असं शरद पवारांनी स्पष्ट केलं. चंदीगडमध्ये आप, भाजप आणि काँग्रेस यापैकी कुणाला बहुमत नव्हतं. निवडणूक आयोगानं ज्यांच्यावर जबाबदारी सोपवली त्यांनी आप काँग्रेसची आठ मतं बाद केली होती.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांचा 'दांडपट्टा' 'राज्यशस्त्र' म्हणून घोषित

**चंद्रपूर, नितीन देवळेकर :**

ज्या किल्ल्यावरून क्रूर, अत्याचारी, जुलमी औरंगजेबाने छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे स्वप्न उधळून टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला, त्याच आग्रा येथील किल्ल्याच्या दिवाण-ए-खासमधून महाराजांच्या आणि मावळ्यांच्या पराक्रमाचे प्रतिक असलेला दांडपट्टा 'राज्यशस्त्र' म्हणून घोषित करण्यात आला. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही घोषणा करताना अभिमानाने उर भरून येत असल्याची भावना व्यक्त केली.



आग्रा येथील किल्ल्यामध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'हर हर महादेव'चा जयघोष करीत अतिशय दिमाखात शिवजयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री एस. पी. बघेल, खासदार, श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, दिग्दर्शक प्रवीण तरडे, अभिनेते मंगेश देसाई, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, विनोद पाटील, विद्याधर पवार, आस्तिक पांडे, गायक नितीन सरकटे आदी मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवराय आणि त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाचा गौरव करण्यासाठी दांडपट्टा या शस्त्राला 'राज्यशस्त्र' म्हणून मान्यता देण्यात येत असल्याचे ना. मुनगंटीवार यांनी सांगितले. यावेळी दांडपट्टा पूजनही करण्यात आले. ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे राज्य स्थापन करण्यासाठी आयुष्यभर जगले.

## 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत पनवेल महापालिकेने बाजी मारली

**पनवेल, विशाल पाटील :**

मराठी माध्यमाचे शिक्षण देणाऱ्या पनवेल महानगरपालिकेच्या दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील प्राथमिक शाळेने तालुक्यातील २४० शाळांना स्पर्धेत मागे टाकत पहिला क्रमांक पटकाविला आहे. शासनाने राबविलेल्या शिक्षण व्यवस्थेमधील उपक्रम कोणती शाळा अचूक राबविते यासाठी केंद्र स्तरापासून ते राज्य स्तरापर्यंत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा ही स्पर्धा घेण्यात आली. विविध उपक्रमांची माहिती संकलित करुन शासनाच्या स्वच्छता मॉनिटर या ॲपवर ही माहिती दिल्यानंतर पालिकेच्या शाळेने तालुक्यात पहिला क्रमांक पटकावला. या स्पर्धेचा पुढील टप्पा हा जिल्हास्तरीय असून त्यानंतर राज्य स्तरीय स्पर्धेसाठी पनवेलची शाळा निवडली जाईल का यासाठी पालिकेचे प्रयत्न सूरु आहेत.



राज्याच्या शिक्षण विभागाने केंद्र स्तरावर, तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर ह्यसुंदर शाळेह्णची स्पर्धा आयोजित केली आहे. तीन दिवसांपूर्वी शासनाच्या शिक्षण विभागाच्या निरिक्षकांनी पनवेल शहरातील महापालिकेच्या शाळा क्रमांक १ दिवगंत लोकनेते दि. बा. पाटील शाळेला भेट दिली. पाच एकर भूखंडावर तीन मजली इमारतीसाठी पनवेल महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांनी १२ कोटी रुपये खर्च करुन ही शाळा बांधली आहे. शाळेचा परिसरात मोठा असल्याने येथे विविध उपक्रम राबविणे शिक्षक व विद्यार्थ्यांना शक्य होते. या शाळेत ३१३ विद्यार्थी पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण घेतात. ३० हून अधिक वर्गखोल्या या शाळेच्या इमारतीमध्ये आहेत. आठ शिक्षकांनी शाळेची अचूक माहिती शासनाच्या स्वच्छता मॉनिटर या ॲपवर लिहीली.

शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांनी केलेली स्वच्छतेची माहिती समाजमाध्यमांवर दर्शविली गेली. वर्गांची सजावट, पोषण आहाराअंतर्गत परसबागेतील फळबागेतील माहिती, वक्तुव स्पधेर्सारख्य विविध स्पर्धेच्या उपक्रमाची माहिती शिक्षकांनी मॉनिटर ॲपमध्ये अचूक दिल्याने तसेच शाळेतील सुशोभिकरण, विद्यार्थ्यांकडून शिक्षकांनी करुन घेतलेल्या उपक्रमांमुळे ही निवड झाली. आयुक्त देशमुख यांनी दिलेल्या माहितीनूसार पालिकेच्या शिक्षण विभागाचे काम पालिकेचे अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त गणेश शेटे, प्रशासन अधिकारी किर्ती महाजन, मुख्याध्यापिका अनुपमा डामरे, सरीता काकडे, विनिता तायडे, वैशाली सावळे, निलम देवळे, अर्चना माने, चंद्रकांत वारघुडे, जयश्री रोढे, वैशाली पाटील हे पाहत आहेत.

## मुंबई बंदरावरचे अतिक्रमण रोखणार 'रक्षक', प्राधिकरणाच्या भूखंडावरील प्रत्येक यार्डासाठी नेमणूक



**मुंबई, दिगंबर जाधव :**

मुंबई बंदर प्राधिकरणाची जमीन मुंबईभर पसरली आहे. त्यातील अनेक जमिनींवर अतिक्रमण झाले आहे. मात्र यापुढे अतिक्रमण होऊ नये यासाठी प्राधिकरणाने तयारी केली आहे. याअंतर्गत भूखंड, जमिनींसह प्राधिकरणाच्या विविध यार्डसाठी स्वतंत्र रक्षकांची नेमणूक होणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेले बॉम्बे बंदर पुढे बॉम्बे पोर्ट ट्रस्ट झाले व त्याचे नामकरण आता केंद्र सरकारने मुंबई बंदर प्राधिकरण (एमबीपीए) म्हणून केले आहे. या बंदराकडे १ लाख चौरस मीटरहून अधिक क्षेत्रफळाची जागा आहे. त्यापैकी जवळपास ४० हजार चौरस मीटरचा भाग हा समुद्रातील बोटी येणे-जाणे करण्यासाठीचा आहे. उर्वरित भाग हा प्रत्यक्ष बंदराचा आहे. बंदरावर ६३ जहाजे उभी करण्याच्या जागा व पाच मोठे धक्के आहेत. याखेरीज मोठ्या जहाजांसाठी खोल समुद्रात ६९ नांगरणीच्या जागा आहेत. प्राधिकरणाकडे प्रत्यक्षात ९४४ हेक्टर जमीन असून ३०० हेक्टर जमिनींवर कर्मचाऱ्यांसाठी रहिवासी वसाहत, कार्यालयीन जागा, अन्य सरकारी विभागांना भाडेतत्त्वावर दिलेल्या जागा यांचा समावेश आहे.या सर्व जागांच्या सुरक्षेसाठी आता प्राधिकरणाकडून स्वतंत्र रक्षक नेमण्याची तयारी सुरू आहे. यासंबंधी मुंबई बंदर प्राधिकरणाने निविदा काढली आहे.

## शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे सरकारची मोठी कारवाई, 170 हून अधिक सोशल मीडिया अकाउंट्स ब्लॉक



**नवी दिल्ली, प्रगती शर्मा:**

केंद्र सरकार आणि शेतकरी नेते यांच्यात झालेली बैठक निष्फळ ठरली आहे. शेतकऱ्यांनी दिल्लीकडे आगेकूच करण्याचा निर्णय घेतला आहे. जाब-हरियाणाच्या शंभू बॉर्डरवर बुधवारी 21 फेब्रुवारीला सकाळी दिल्लीच्या दिशेने शेतकरी पुढे सरकू लागले आहेत. आमच्या मागण्या लवकर मान्य करा अन्यथा दिल्लीत येऊन चक्काजाम करू, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने जवळपास 177 सोशल मीडिया अकाऊंट्स आणि वेबसाइट्स काही काळासाठी बंद केली आहेत. पीटीआयच्या वृत्तानुसार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने 14 आणि 19 फेब्रुवारी रोजी हे आदेश जारी केले होते. गृह मंत्रालयाच्या विनंतीवरून आयटी कायद्याच्या कलम 69अ अंतर्गत ही अकाऊंट्स आणि वेबसाइट्स ब्लॉक करण्यात आली आहेत. रिपोर्टनुसार, गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, कायदा आणि सुव्यवस्था राखता यावी यासाठी काही सोशल मीडिया अकाऊंट्स आणि वेबसाइट्स काही काळासाठी बंद करण्यात आली आहेत. भारत सरकारच्या आयटी कायद्याच्या कलम 69अ अंतर्गत, कोणत्याही वेबसाइट्स किंवा सोशल मीडियावर उपलब्ध असलेली माहिती लोकांसाठी बंद करण्याचा आदेश देण्याचा अधिकार आहे. या कायद्यानुसार जून 2020 मध्ये सरकारने अनेक चिनी वेबसाइट बंद केल्या होत्या. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, स्नॅपचॅट आणि इतर अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील काही अकाऊंट्स आणि वेबसाइट्सच्या लिंक्स बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. ही अकाऊंट्स काही काळासाठीच बंद करण्यात आली असून, शेतकऱ्यांचा विरोध संपल्यानंतर ती पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, शेतकरी नेते आणि केंद्रीय मंत्र्यांसोबत आतापर्यंत चार बैठका झाल्या. या बैठकांमध्ये केंद्राने शेतकऱ्यांसमोर काही प्रस्ताव ठेवले. मात्र, हे प्रस्ताव शेतकरी नेत्यांनी अमान्य केले. सरकारसोबत आता चर्चा करण्यात काही तथ्य नाही, असं म्हणत शेतकऱ्यांनी आजपासून (बुधवार) दिल्लीच्या दिशेने कूच करण्याची तयारी केली आहे. तसेच, शेतकऱ्यांचे आंदोलन दिल्लीत येण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांनी दिल्लीच्या सर्व सीमा बंद केल्या आहेत.

## '२४ फेब्रुवारीपासून राज्यभर आंदोलन, तर ३ मार्चला रास्तारोको', जरांगेंच्या आंदोलनाची दिशा ठरली !

**जालना विशेष प्रतिनिधी :**

राज्यात २८ टक्के लोकसंख्या असलेला मराठा समाज अनेक दशकांपासून पिढ्यान् पिढ्या मागासलेला राहिला. हा वर्ग इतका दुर्बल आणि वंचित आहे की त्याला विद्यमान मागासवर्गीयांपासून स्वतंत्र आरक्षण देणे गरजेचे आहे, असा निष्कर्ष नोंदवत आणि हीच अपवादात्मक आणि असाधारण परिस्थिती असल्याचे नमूद करून राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला स्वतंत्र संवर्ग करून आरक्षण देण्याची शिफारस केली ही शिफारस स्वीकारून राज्य सरकारने ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिले. विधिमंडळात विशेष अधिवेशनात मंगळवारी हा कायदा कोणत्याही चर्चेविना एकमताने मंजूर करण्यात आला. दरम्यान, मनोज जरांगे पाटलांनी या विधेयकावर आक्षेप नोंदवून



सगेसोयरे तरतुदीवर ठाम भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता त्यांनी आंदोलनची पुढची भूमिका बुधवारी स्पष्ट केली. मनोज जरांगे पाटलांनी सरकारला २३ फेब्रुवारीपर्यंत अल्टिमेटम दिला आहे. त्यानुसार, सरकारने सगसोयऱ्यांसदर्भात कायदा केला नाही तर २४ फेब्रुवारीपासून राज्यभर आंदोलन करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यभरातील मराठा बांधवांना आंदोलनाची दिशा स्पष्ट केली आहे. २४ फेब्रुवारीपासून प्रत्येक गावात, शहरात सकाळी साडेदहा वाजल्यापासून दुपारी १ वाजेपर्यंत आंदोलन करायचं आहे. या काळात प्रत्येकाने आपल्या गावात रास्ता रोको करायचा आहे, असं आवाहन मनोज जरांगेंनी आज मराठा बांधवांना केलं. ज्यांना सकाळच्या वेळी आंदोलन करता येणार नाही, त्यांनी सायंकाळी चार ते रात्री ७ वाजेपर्यंत आंदोलन करायचं आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. तसंच, या काळात शांततेत आंदोलन करायचे आहे. जाळपोळ किंवा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी घेऊन आंदोलन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, २४ तारखेपासून आपल्या गावात-शहरांत रास्ता रोको केल्यानंतर ३ मार्चला जगातील सर्वांत मोठा रास्ता रोको करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ३ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच जिल्ह्यांत, एकाच ठिकाणी एकाच वेळी (दुपारी १२ ते १) मोठा रास्ता रोको करायचा आहे.

//सुविचार
दगडाला शेंदूर लावून त्याचा देव करता येईल
मात्र माणसाला कोणता रंग लावावा म्हणजे त्याचामाणूस करता येईल. //



# पालक खांडवी

**साहित्य :** १ वाटी बेसन, १ वाटी दही, दीड वाटी पाणी, १/२ वाटी पालकाची पेस्ट, १ चमचा आलं, लसूण व हिरव्या मिरच्यांची पेस्ट, १ चिमूट हिंग, मीठ चवीनुसार.

**फोडणीचे साहित्य :** १ मोठा चमचा खोबऱ्याचा बुरा, १ चमचा तेल, १ चमचा मोहरी, १ लहान चमचा तिखट.

**कृती :** सर्वप्रथम बेसनात दही मिसळावे. नंतर त्यात मीठ, पाणी व इतर साहित्य घालून चांगल्याप्रकारे एकजीव करावे, त्यात गोळे नाही पडले पाहिजे. या मिश्रणाला कढईत घालून घट्ट होईस्तोर चांगले हलवावे. एका ताटात थोडासा घोळ घालून पसरवावे व दोन-तीन मिनिटांनी त्याचे रोल तयार करावे, जर रोल आरामात बनले तर समजावे खांडवी तयार आहे. नंतर ताटात किंवा



गॅसच्या ओट्यावर ते मिश्रण १-१ इंचेच्या पातळ स्ट्रिपमध्ये पसरवावे. आता या मिश्रणाचे रोल तयार करावे. गरम तेलात मोहरी व तिखट घालून त्याची फोडणी तयार करून ती त्या रोलवर टाकावी. वरून खोबऱ्याचा बुरा घालून सर्व्ह

# पेट्रोलियम जेलीचे विविध उपयोग



मैत्रिणींनो, हिवाळा सुरू झाला की पेट्रोलियम जेलीच्या जाहिराती सर्वत्र झळकू लागतात. हिवाळ्यात असलेल्या कोरड्या हवामानामुळे त्वचा रुक्ष होऊ लागते. अशी खरखरीत त्वचा त्रासदायक ठरते. अशा वेळी या त्वचेला पुन्हा मूळस्वरूपात आणण्याचं काम पेट्रोलियम जेलीचा वापर करून केलं जातं.

**पेट्रोलियम** जेलीचा उपयोग केवळ त्वचेचा स्निग्धपणा कायम राखण्याइतपतच होतो असं नाही. याव्यतिरिक्तही पेट्रोलियम जेलीच्या काही वेगळ्या उपयोगांविषयी...

**अँटी रिंकल क्रीम-**
पेट्रोलियम जेलीमुळे त्वचेतील स्निग्धांश कायम राखला जातो. त्यामुळे त्वचा कोरडी पडून अकाली येणाऱ्या सुरकुत्यांच्या प्रमाणात घट होते.

**लिप बाम-**
पेट्रोलियम जेलीचा उपयोग लिप बामसारखाही केला जातो. पेट्रोलियम जेली ओठांना हायड्रेट करून त्यांचा नरमपणा कायम ठेवते.



**नैसर्गिक चमक -**
या दिवसात मेकअप केल्यानंतरही चेहरा निस्तेज दिसू लागतो. पेट्रोलियम जेलीच्या वापराने चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येण्यास मदत होते.

**मेकअप रिमूव्हर-**
मेकअप काढून टाकण्यासाठी मेकअप रिमूव्हरऐवजी पेट्रोलियम जेलीचा वापर करता येणं शक्य आहे.

**कलर स्टेन रिमूव्हर-**
हेअर कलर करताना हेअर लाइनला पेट्रोलियम जेली लावा. त्यामुळे कलर स्काल्पवर पसरणार नाही.

**परफ्यूम बेस-**
परफ्यूम मारण्यापूर्वी त्या जागेवर पेट्रोलियम जेली लावा. परफ्यूमचा सुगंध जास्त काळ राहतो.

**आफ्टर शेव्ह लोशन-**
शेव केल्यानंतर त्वचा कोरडी होते. त्यामुळे त्या ठिकाणी पेट्रोलियम जेली लावा.

# जेवण झाल्या-झाल्या टॉयलेटला जावं लागत असल्यास हा उपाय करून बघा

**विचार** करा! जर आपण एखाद्या समारंभात गेला आहात. तिथे सर्व पदार्थ आपल्या आवडीचे आहे. पण आपण हे खाण्यास घाबरत आहात. कारण आपल्याला खाल्ल्यावर लगेचच शौचास जावं लागतं. कल्पनेच्या व्यतिरिक्त जे लोक या त्रासाला अनुभवत आहेत किंवा सोसत आहेत त्यांच्यासाठी हे सत्य अनुभवणे फार भयावह आहे.

हा त्रास अधिक गंभीर तेव्हा होतो जेव्हा खाल्ल्यावर टॉयलेटला जाण्यामुळे आपले वजन कमी होतं. बऱ्याच वेळा टॉयलेटला जाण्यामुळे काही लोक जेवणच कमी करतात. म्हणून आज आम्ही आपल्याला सांगत आहोत यावर काही उपाय, जे अवलंबल्याने आपल्याला या त्रासापासून मुक्ती मिळू शकते. सर्वप्रथम समस्येला जाणून घेऊ या.

**गॅस्ट्रो कॉलिक रिफलक्स-**
जेवण झाल्यावर लगेचच शौचास किंवा टॉयलेटला जाण्याच्या त्रासाला गॅस्ट्रो-कॉलिक रिफलक्स म्हणतात. असे दिसून आले आहे की, हा त्रास त्यांना जास्त होतो ज्यांना बऱ्याच काळ टॉयलेट किंवा शौचास रोखण्याची सवय असते.



**हे उपाय अवलंबवा-**
- चावून चावून खाणे.
- फायबर असलेले पदार्थ सेवन करावे.
- ३-४ वेळा थोडं-थोडं अन्न खा.

**आहारात हे पदार्थ समाविष्ट करा-**
या त्रासापासून वाचण्यासाठी फायबर असलेल्या पदार्थांचा समावेश करावा. फायबर असलेल्या पदार्थांमध्ये नाशपती, सफरचंद, वाटाणे, ब्रोकोली, शाबूत धान्य, शेंगा आणि डाळी आहे. तसेच आहारात दही, कच्चं सॅलड किंवा कोशिंबीर, आलं, अननस, पेरू, ओवा इत्यादी समाविष्ट करणे. याशिवाय केळी, आंबे, पालक, टमाटे, शेंगदाणे, शतावरी. या आहारात पोटॅशियम मुबलक प्रमाणात आढळतं, म्हणून हा आहारदेखील

# आवळ्याचे सेवन करताना 'या' गोष्टी लक्षात ठेवा

**आयुर्वेदामध्ये** आवळ्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आवळ्यामध्ये 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असतं. उत्तर व दक्षिण भारतात प्रामुख्यानं आवळ्याचं उत्पादन घेतलं जातं. आवळ्याचे 'पांढरे आवळे' आणि 'रान आवळे' असे दोन प्रमुख प्रकार आहेत. आवळ्याच्या सेवनानं शरीर शुद्ध होऊन रोगप्रतिकारक शक्ती वाढते. आवळ्याचा हंगाम आता सुरू झाला आहे, त्यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणात आवळे उपलब्ध आहेत. चला तर मग या बहुगुणी आवळ्याचे फायदे आणि तो कधी खाणं योग्य ठरेल हे जाणून घेऊ.

**आवळ्याचे फायदे**
- डोकं शांत राहणं किंवा केसांच्या सर्व तक्रारींसाठी आवळ्याचं तेल इतर औषधींसह नियमित वापरल्यास फरक पडतो.
- ज्यांना पित्ताचा त्रास आहे त्यांनी सकाळी 'मोरावळा' खाल्ल्यास फायदेशीर ठरेल.
- लघवी साफ न होणे, आम्लपित्त, चक्कर येणे, पोट साफ न होणे अशा अनेक तक्रारींवर आवळा अत्यंत गुणकारी आहे.
- आवळ्यात 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असल्यामुळे त्वचा रोगावर आवळा उत्तम औषध आहे.
- आवळ्याच्या नियमित सेवनाने शरीरातील रक्ताभिसरण क्रिया सुरळीत चालू राहते.



# लक्षद्वीपमध्ये प्रवास करण्यासाठी भारतीयांना घ्यावं लागतं परमिट; असा करा अप्लाय

भारतीय नागरिक थेट लक्षद्वीपसाठी विमान बुक करून जाऊ शकत नाहीत, त्याआधी त्यांना परमिट घ्यावं लागतं. हे परमिट ऑनलाइन मिळण्याची आम्ही पद्धत पुढे दिली आहे.

**लक्षद्वीप बेटावर ऑनलाइन प्रवेश परवानगी प्रोसेस**

सध्या लक्षद्वीप खूप चर्चेचा विषय बनला आहे. अरबी समुद्रात असलेल्या या द्वीप समूहात एकूण ३६ बेटे आहेत. जर तुम्हाला इथलं नैसर्गिक सौंदर्य पाहायला जायचं असेल तर तुम्हाला आधी लक्षद्वीप परमिट घ्यावं लागेल. एण्ट्री परमिट तुम्ही ऑनलाइन देखील मिळवू शकता. चला जाणून घेऊया लक्षद्वीपसाठी ई-परमिट कसं लक्षद्वीपसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धतीनं परमिट मिळवता येतं. जर तुम्हाला ऑनलाइन परमिटसाठी अर्ज करायचा असेल तर पुढील स्टेप को फॉलो करा:

सर्वप्रथम लक्षद्वीप ई-परमिट पोर्टल https://epermit.utl.gov.in//poges/sigfup वर जा.

तिथे रजिस्ट्रेशन करा. त्यासाठी नाव, ईमेल आयडी आणि मोबाइल नंबर नोंदवा.

त्यानंतर तुमच्या मोबाइल नंबरवर ओटीपी येईल, जो टाकल्यानंतर नंतर पासवर्ड, कॅप्चा कोड टाकून सर्वात खाली रजिस्टर बटन मिळेल, त्यावर टॅप करा.

रजिस्ट्रेशन कंप्लीट झाल्यानंतर होम पेजवर साइन-इनचा ऑप्शन मिळेल, तुमचा ईमेल आयडी, पासवर्ड आणि कॅप्चा कोड टाका आणि लॉगिन करा.

त्यानंतर ई-परमिटच्या सेक्शनमध्ये जा.

त्यानंतर अप्लाय फॉर न्यू परमिटवर क्लिक करा.

एक नवीन पेज ओपन होईल, ज्यात तुम्हाला लक्षद्वीपच्या भेटीचं कारण, कालावधी, रेशनकार्ड नंबर, कोणत्या बेटावर राहणार इत्यादी माहिती द्यावी लागेल. तसेच आवश्यक डॉक्युमेंट देखील अपलोड करावे लागतील.

त्यानंतर तुम्हाला ऑनलाइन परमिट फीस द्यावी लागेल. मग तुम्हाला परमिट रिक्वेस्ट नंबर मिळेल.

तुमचं परमिट ट्रॅक करण्यासाठी तुम्हाला ट्रॅक परमिट ऑप्शनवर क्लिक करावे लागेल. त्यानंतर तुम्हाला परमिट रिक्वेस्ट नंबर टाकून सबमिट बटनवर क्लिक करा. म्हणजे तुमच्या परमिटच्या स्टेटसची माहिती मिळेल.

ई-परमिट तुम्हाला ईमेलच्या माध्यमातून ट्रिप डेटच्या १५ दिवस आधी मिळेल.

**लक्षद्वीप ई-परमिटचे शुल्क**

लक्षद्वीपचे रहिवासी आणि सरकारी कर्मचारी ज्यांची ड्युटी लक्षद्वीपमध्ये आहे, त्यांना परमिटची आवश्यकता नाही. परंतु त्याव्यतिरिक्त सर्व भारतीय नागरिक आणि परदेशी पर्यटकांना परमिट घेणं आवश्यक आहे. तसेच पर्यटकांना सर्व बेटांवर जातात येत नाही. भारतीय पर्यटक फक्त कावरत्ती, अगत्ती, बंगाराम, कदमत आणि मिनिकॉय बेटांवर जाऊ शकतात.

लक्षद्वीप ई-परमिटसाठी प्रति व्यक्ती ५० रुपये द्यावे लाटत. तसेच, १२-१८ वर्षांच्या नागरिकांसाठी हेरिटेज फी १०० रुपये आणि तसेच १८ वर्षांवरील नागरिकांसाठी हेरिटेज फी २०० रुपये आहे.

**लक्षद्वीप परमिटसाठी आवश्यक डाक्युमेंट्स**
पासपोर्ट साइज फोटो
वैध ओळखपत्र (आधार कार्ड, व्होटर आयडी, रेशन कार्ड इत्यादी) ट्रॅव्हल प्रूफ (विमानाचं तिकीट, बोट रिजर्व्हेशन)
हॉटेल बुकिंग कन्फर्मेशन इत्यादी



# ओलसर कपड्यांमुळे पुरळ



**पावसाळ्यात** अंघोळीनंतर ओलसर दमट कपडे वापरणे शक्यतो टाळावे. आतील कपडे पूर्णपणे वाळलेले नसल्यास इस्त्री फिरवून ते पूर्णपणे कोरडे करून वापरावेत, नाही तर अंगावर पुरळ येण्याची शक्यता असते.

# अथांग समुद्र, रोमँटिक पोझ अन, प्रथमेश परबचं क्षितीजाबरोबरचे प्री-वेडिंग फोटोशूट



मराठीतील लोकप्रिय अभिनेता प्रथमेश परब सध्या खूपच चर्चेत आहे. १४ फेब्रुवारी म्हणजेच व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी त्याचा साखरपुडा पार पडला. या साखरपुड्याचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. आता २४ फेब्रुवारीला प्रथमेश त्याची प्रेयसी क्षितिजा घोसळकर हिच्याबरोबर लग्नगाठ बांधणार आहे. प्रथमेश सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ तो चाहत्यांबरोबर शेअर करीत असतो. दरम्यान, प्रथमेशच्या नव्या फोटोने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. नुकतेच प्रथमेश व क्षितिजाने प्री-वेडिंग फोटोशूट केले. कोकणात श्रीवर्धन येथे समुद्रकिनाऱ्याजवळ दोघांनी फोटोशूट केले. यावेळी दोघांनी पांढऱ्या रंगाचे कपडे घातले होते. प्रथमेशने पांढऱ्या रंगाचा कुर्ता वा पायजमा घातला होता; तर क्षितिजाने पांढऱ्या रंगाची साडी नेसली होती. त्याबरोबर तिने केसांत गुलाबाचे फूलही माळले होते. या लूकमध्ये दोघे खूपच सुंदर दिसत होते. मंगळ आणि बुध ग्रह जवळ येणार, पूर्व क्षितीजावर अपूर्व अनुभूती; वाचा अनोख्या दृष्याचा आनंद केव्हा घेता येणार? प्रथमेशने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर या फोटोशूटचे काही निवडक फोटो शेअर केले आहेत. प्रथमेशचे हे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. अनेक चाहत्यांनी या फोटोवर कमेंट्स केल्या आहेत. प्रथमेशच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास, आतापर्यंत त्याने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - १३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 9 | | | 4 | | 3 | 5 |
| 1 | | 7 | 9 | 2 | | 4 | 6 | |
| | | | | 6 | | 9 | 7 | |
| 7 | | | | | | | | 3 |
| | 2 | | 8 | | | | | |
| 5 | | 6 | 1 | 3 | | | 9 | |
| 6 | 3 | 4 | | 5 | | | | |
| | | | | 9 | | 3 | | |
| | | | | | 1 | | | |

## उत्तर सुडोकू -१२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 3 | 4 | 6 | 2 | 1 | 9 | 8 | 7 |
| 6 | 2 | 8 | 5 | 7 | 9 | 3 | 1 | 4 |
| 7 | 9 | 1 | 8 | 3 | 4 | 2 | 5 | 6 |
| 8 | 5 | 2 | 1 | 6 | 3 | 4 | 7 | 9 |
| 1 | 6 | 9 | 4 | 8 | 7 | 5 | 2 | 3 |
| 3 | 4 | 7 | 9 | 5 | 2 | 8 | 6 | 1 |
| 4 | 8 | 3 | 7 | 1 | 5 | 6 | 9 | 2 |
| 9 | 1 | 5 | 2 | 4 | 6 | 7 | 3 | 8 |
| 2 | 7 | 6 | 3 | 9 | 8 | 1 | 4 | 5 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# तंबूतून टॉवरपर्यंत! यशस्वी जैस्वालची गगनभरारी; मुंबईत घेतलं ५ कोटींचं घर!



अतिशय सामान्य कुटुंबातून येऊन आज देशभरात स्वतःचे नाव गाजविणारा भारताचा फलंदाज यशस्वी जैस्वालनं मुंबईत आपल्या हक्काचं घर घेतलं आहे. एकेकाळी मुंबईत तंबूत गुजराण करणाऱ्या यशस्वी जैस्वाल आणि त्याच्या कुटुंबियांसाठी हा नक्कीच अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. अतिशय खडतर परिस्थितीतून येऊन आपल्या स्वप्नांचा पाठलाग करणाऱ्या यशस्वीने वांद्रे पूर्व येथील बीकेसी प्रोजेक्टमध्ये एक आलीशान घर घेतले आहे. या घराची किंमत ५.३८ कोटी असल्याचे सांगितले जाते. सध्या निमार्णाधीन असलेल्या या प्रकल्पातील घराचे क्षेत्रफळ १,११० स्वे. फूट असल्याचे झॅपकी या बांधकाम क्षेत्राशी निगडित असलेल्या संकेतस्थळाने निदर्शनास आणून दिले आहे. मनीकंट्रोलने दिलेल्या बातमीनुसार, बीकेसी प्रोजेक्टची निमार्ती कंपनी अदाणी रिएलीटी ने मात्र या व्यवहाराबाबत कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. बीकेसी प्रोजेक्टला थोडी वादाची पार्श्वभूमी आहे. त्याचे मूळ प्रवर्तक असेलल्या रेडीयस इस्टेटची दिवाळखोरी जाहीर झाल्यानंतर अदाणी रिएलीटीने प्रकल्पाचे काम हाती घेतले. वांद्रे कुर्ला संकुलातील या घराच्या प्रति स्क्वे. फूटासाठी यशस्वी जैस्वालने तब्बल ४८,००० रुपये मोजले आहेत. या वर्षीच्या अखेरीपर्यंत हा प्रकल्प पूर्ण होण्याचे संकेत दिले जात आहेत. १९ वर्षांखालील संघात धडाकेबाज कामगिरी केल्यानंतर २०२० साली राजस्थान रॉयल्सने तब्बल २.४ कोटी खर्च करून यशस्वी जैस्वालला संघात घेतले होते. २०२२ साली राजस्थानने चार कोटी रुपये मोजून त्याला संघात कायम ठेवले. २०२३ च्या आयपीएल हंगामात यशस्वी जैस्वालने अवघ्या १३ चेंडूंत तडाखेबाज फलंदाजी करत अर्धशतक पूर्ण केले. ही कामगिरी करताना त्याने केएल राहूल आणि पॅट कमिन्स यांचा विक्रम मोडीत काढला. डीएनएने दिलेल्या बातमीनुसार, जैस्वालची एकूण संपत्ती १०.७३ कोटी असल्याचे सांगितले जाते. आयपीएल वगळता भारताचा हा तरुण क्रिकेटपटू महिन्याकाठी ३५ लाखांची कमाई करतो.

## दिनविशेष

### २२ फेब्रुवारी

- १८१९: स्पेनने फ्लोरिडा हा प्रांत अमेरिकेला ५० लाख डॉलरच्या मोबदल्यात विकला.
- १९४२: दुसरे महायुद्धः फिलिपाईन्समध्ये जपानी सैन्याकडुन पराभव अटळ दिसत असल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एफ. डी. रूझवेल्ट यांनी जनरल डग्लस मॅकआर्थरला माघार घ्यायचा हुकुम दिला.
- १९४८: झेकोस्लोव्हाकिया मध्ये कम्युनिस्ट क्रांती.
- १९५८: इजिप्त आणि सीरिया या देशांनी एकत्र येऊन युनायटेड अरब प्रजासत्ताक तयार केले.
- १९७८: श्री. यशवंत विष्णू चंद्रचूड यांनी भारताचे १६ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
- १९७९: सेंट लुशिया ला ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाले.
- १७३२: अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांचा जन्म. (मृत्यू: १४ डिसेंबर १७९९)
- १८३६: महामहोपाध्याय पण्डित महेशचंद्र न्यायरत्न भट्टाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल १९०६)
- १८५७: जर्मन भौतिकशास्त्रज्ञ हेनरिच हर्ट्झ यांचा जन्म. (मृत्यू: १ जानेवारी १८९४)
- १८५७: बालवीर चळवळीचे प्रणेते लॉर्ड बेडन पॉवेल यांचा जन्म. (मृत्यू: ८ जानेवारी १९४१)
- १९०२: जर्मन भौतिकशात्रज्ञ फ्रिट्झ स्ट्रासमान यांचा जन्म. (मृत्यू: २२ एप्रिल १९८०)
- १९२०: चरित्र अभिनेता इफ्तिखार यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च १९९५)
- १९२२: व्हायोलिनवादक व्ही. जी. जोग यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जानेवारी २००४)
- १९६४: मॉर्टल कोमबॅट व्हिडिओ गेमचे निर्माते एड बून यांचा जन्म.
- १९७५: अमेरिकन अभिनेत्री, दिग्दर्शक, निमार्ता ड्रिव बॅरीमोर यांचा जन्म
- १८१५: हिरा हा कार्बनच असतो हे प्रयोगावरुन सिद्ध करणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ स्मिथसन टेनांट यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १७६१)
- १८२७: चित्रकार, निसर्गवैज्ञानिक व सैनिक चार्ल्स विल्सन पील अमेरिकन यांचे निधन. (जन्म: १५ एप्रिल १७४१)

## भविष्य

**मेष** – मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्या. शांत राहणे सर्वात उत्तम. इतरांनी काय करावे, काय करू नये याचा सल्ला देत बसू नका.

**वृषभ** – जे दिवस चांगले आहेत अशा कालावधीत एका दगडात दोन पक्षी मारण्याचा डाव साध्य होईल. तेव्हा आता कामाला लागा.

**मिथुन** – इतरांशी तुलना करणे टाळा. स्वतःच्या कामाची जबाबदारी कोणावर सोपवू नका. त्यामुळेतुमची घडी विस्कळीत होणार नाही हे लक्षात ठेवा.

**कर्क** – व्यावसायिकदृष्टया परिस्थितीत बदल होईल आणि तो चांगला असेल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. मित्र-मैत्रिणींशी करमणूक होईल.

**सिंह** – बाकी दिवसांचा कालावधी उत्तम असेल. ज्यावेळी कालावधी उत्तम असतो. त्यावेळी मात्र कोणत्याही कामासाठी फार कसरत करावी लागत नाही. धार्मिक गोष्टीत उत्साह वाढेल.

**कन्या** – ज्या कामांमध्ये प्रयत्न करूनही यश मिळत नव्हते त्या कामामध्ये यश मिळेल. व्यवसायात खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठया प्रमाणात होतील. नोकरदार वर्गाचे कामाचे नियोजन उत्तम राहील.

**तुला** – नोकरदार वर्गाच्या कामातील तांत्रिक अडचणी कमी होतील आर्थिक बाबतीत समाधानी राहाल.राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवायचे नाही म्हटले तरी ठेवावे लागेल. त्यामुळे प्रतिष्ठा वाढेल.

**वृश्चिक** – आर्थिक भरभराट होईल. राजकीय क्षेत्रात धाडसी निर्णय घ्याल. स्थावर मालमत्तेचा प्रश्न निकालात निघेल. नातेवाईकांकडून शुभेच्छा मिळतील. धार्मिक कायाची आवड राहील.

**धनु** – आपली देहबोली सांभाळ. इतरांकडून फारशी अपेक्षा ठेवू नका. तुम्हाला स्वतःलाही काही प्रयत्न करावे लागतील. तेव्हा कोण चांगले कोण वाईट या गोष्टीचा सध्यातरी विचार करत बसू नका.

**मकर** – आर्थिक बाबतीत नियोजन करावे लागेल. शेजाऱ्यांशी जेवढयास तेवढे राहा. कौटुंबिक वादविवाद टाळा. जोडीदाराच्या भावनांचा आदर करा. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

**कुंभ** – व्यवसायात धरसोड वृत्ती राहील. नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत व्यवहार चोख ठेवावे लागतील. षष्ठस्थानातून अष्टमस्थानाकडे चंद्राचे भ्रमण होत आहे असे भ्रमण म्हणजे दुधात मिठाचा खडा असे म्हणायला हरकत नाही.

**मीन** – सध्या दिवस चांगले नाहीत हे माहीत असतानासुद्धा वादविवाद करणे तुमच्यासाठी त्रासाचे राहील. कोणाच्या वागण्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका. प्रत्येक दिवस चांगला कसा घालवता येईल या दृष्टीने प्रयत्न करा. आपली डाळ शिजणार नाही.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

